**महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग**

**जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत आरोग्य विभागाशी संबंधित गट क मधील पदे भरण्यासाठी जाहिरात**

**पदभरती २०१९**

## शुध्दीपत्रक - संक्षिप्त जाहिरात क्र. ०१/२०२१

संदर्भ : १ कार्यालयीन जाहीरात क्र ५४०/२०१९ दिनांक: ०१/०३/२०१९
२ महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचे शासन पत्र क्रमांक संकीर्ण २०२०/प्रक्र ९९/ आस्था ८ दि. २० ऑगस्ट २०२१
३ महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचे शासन शुध्दीपत्रक क्रमांक संकीर्ण २०२०/प्रक्र ९९/ आस्था ८ दि. २० ऑगस्ट २०२१
४ महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचे शासन शुध्दीपत्रक क्रमांक संकीर्ण २०२०/प्रक्र ९९/ आस्था ८ दि. ०१ सप्टेंबर २०२१

पदभरती -२०१९ च्या अनुषंगाने आरोग्य विभागातील ५ संवर्गांच्या भरतीबाबद संदर्भिय शासन शुध्दीपत्रक दिनांक २० ऑगस्ट २०२१ च्या अनुषंगाने दिनांक २५.८.२०२१ अन्वये या कार्यालयाकडून सुधारीत जाहीरात प्रकाशीत करण्यात आली होती. ग्राम विकास विभागाचे शासन शुध्दीपत्रक दिनांक १.९.२०२१ अन्वये सुधारीत सुचना प्राप्त आहेत. त्यानुसार जाहिरातीमध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

माहे मार्च २०१९ च्या जाहिरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरिता उमेदवारांना एक किंवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदामधील एक किंवा अधिक संवर्गातील पदांसाठी अर्ज करण्याची मुभा होती. तथापि. आता शासनाचे महापरिक्षा पोर्टल रद्द झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबंधीत पदभरती ही OMR Vendor मार्फत offline पध्दतीने राबविण्यात येणार असल्याने उपरोक्त ५ संवर्गाची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे. तथापि ५ संवर्गाच्या पदभरती संदर्भात घेण्यात येणाऱ्या परिक्षेसाठीच्या प्रत्येक संवर्गाची प्रश्नपत्रिका सर्व जिल्हा परिषदांसाठी संवर्गनिहाय सामायिक राहणार आहे. त्यामुळे सन २०१९ च्या जाहिरातीनुसार ज्या उमदवाराने एक किंवा एकापेक्षा अधिक संवर्गाच्या परिक्षेसाठी एकापेक्षा अधिक जिल्हा षदेमधून अर्ज भरलेले आहेत त्य उमदवारांचे सर्व ठिकाणी भरलेले अर्ज ग्राहय धरले जातील. अशा उमदवारांबाबत त्याने प्रत्यक्ष एकाच जिल्हा परिषद तर्गत आयोजित परिक्षेस उपस्थित राहून परिक्षा दिनतर सदर परिक्षेमध्ये त्याला प्राप्त होणाऱ्या गुणांच्या आधारे त्याने ज्या ज्या जिल्हा परिषदेतून सदर पदभरतीसाठी अर्ज भरला आहे त्या त्या जिल्हा परिषदांच्या सदर पदाकरीताच्या तयार होणाऱ्या गुणवत्ता (प्रवर्गनिहाय) यादीमध्ये त्याचे नाव गुणवत्ता क्रमांकानुसार अंतर्भूत केले जाईल.

तसेच नव्याने समाविष्ठ झालेले दिव्यांग प्रवर्ग व खुल्या प्रवर्गात नव्याने वाढ झालेल्या रिक्त जागासाठी प्रसिध्द होणाऱ्या जाहिरातीनुसार परिक्षेला बसु इच्छिणाऱ्या उमेदवाराला विभागाच्या दि. २३.७.२०१८ च्या शासन निर्णय नुसार एक किंवा एकापेक्षा अधिक जिल्हा परिषदांमध्ये पदांसाठी अर्ज करता येईल. तसेच एका उमेदवाराला एका किंवा अनेक संवर्गातील पदासाठी अर्ज करण्याची मुभा राहील. परंतु प्रत्येक पदासाठी त्याला स्वतंत्र परिक्षाशुल्क आकारले जाईल. तसेच उमेदवाराने परिक्षेसाठी उपस्थित राहण्याकरिता जिल्हा परिषदेचा विकल्प देणे आवश्यक आहे याबाबत www.maharddzp.com या संकेतस्थळावर जाउन अर्ज सादर करणे आपश्यक आहे. त्याप्रमाणे उमेदवारास प्रवेशपत्र पाठविण्यात येईल. तसेच सदर उमेदवारांबाबतही परिक्षा व गुणवत्ता यादीबाबतची कार्यपध्दती वरील परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे राहिल असे वाचावे.

* शासन शुध्दीपत्रक दि. २०.८.२०२१ सोबतच्या विवरणपत्र अ मधील मुद्दा क्र. ८ रद्द करण्यात येत आहे व विवरणपत्र ब मधील अ.क्र. २ मधून एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवारांकडून जिल्ह्याचा विकल्प घेणे ही बाब वगळण्यात येत आहे.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याची सुविधा **ww.maharddzp.com** संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

याबाबत अधिक सविस्तर माहितीची जाहिरात **ww.maharddzp.com** व **ww.zpgondia.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज करण्यासाठी **ww.maharddzp.com** हे संकेतस्थळ दिनांक ०१-०९-२०२१ ते २१-९-२०२१ अखेर कार्यरत राहील. अर्ज सादर करण्यापूर्वी उमेदवाराने स्तर जाहिराती मध्ये व जाहिर प्रकटनातील दिलेल्या सर्व सूचना काळजीपूर्वक वाचून अर्ज सादर करावे. विकल्प नोंदविताना काही अडचणी उद्भवल्यास उमेदवारानी **०७२९२००६३०५** या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

भरती प्रक्रिया/परिक्षा स्थगीत करणे किंवा रदद करणे, अंशत: बदल करणे, पदाच्या एकुण व संवर्गनिहाय संख्या मध्ये **वाढ करणे किंवा घट करण्याचे अधिकार जिल्हा निवड समितीला राहतील. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही किंवा वाद उपस्थित करता येणार नाही.**

ठिकाण : गोंदिया
दिनांक : ०६-०९-२०२१

सदस्य सचिव निवड समिती
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी
जि.प. गोंदिया

सदस्य निवड समिती
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
जि.प. गोंदिया

अध्यक्ष जिल्हा निवड समिती
गोंदिया तथा जिल्हाधिकारी गोंदिया
गोंदिया